# नाविन्यपूर्ण नवोपक्रम

सन २०२२-२३

## उपक्रमाचे नाव

### गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न

अर्थात

### मिशन अक्षर, वाचन व लेखन आणि १००% शाळाभेट कार्यक्रम


सादरकर्ते :- श्री सतीश गणपतराव दर्शनवाड

(गटशिक्षणाधिकारी)

पंचायत समिती उमरखेड, जि.यवतमाळ

पिन कोड - 445206

मो.नं. :- 9657582612

## : परिचय :



- नाव - श्री सतीश गणपतराव दर्शनवाड
- पद – गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती उमरखेड, जि.यवतमाळ
- जन्मतारीख – १३/०५/१९९५
- नोकरी सुरू तारीख -३०/०९/२०१९
- एकूण सेवा –४ वर्ष २ महिने
- कायमचा पत्ता – मु.पो.जीरोना ता.उमरी जि. नांदेड

## प्रतीज्ञापत्र

मी श्री. सतिश गणपतराव दर्शनवाड प्रतीज्ञापत्र लिहून देतो की , या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शेक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारीत आहे. हा नवोपक्रम मला स्व्त:ला सुचलेला आहे, काल्ननिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इरत कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आलास तो Copyright Act. 1957 खाली दाखल गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

**दिनांक :-** 28/11/2023
**स्थळ :-** **उमरखेड**

**स्पर्धकाची स्वाक्षरी**
**नांव :- सतिश गणपतराव दर्शनवाड**
**गट शिक्षणाधिकारी**
**पंचायत समिती,उमरखेड**

## प्रमाणपत्र

मी श्री. सतिश गणपतराव दर्शनवाड हे माझ्या कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला हा नवोपक्रम शैक्षणिक सत्र 2022-23 मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून तो त्यांच्या स्व-परिक्षमाची फलश्रृती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महराष्ट्र ख् पुणे मार्फत आयोजीत यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

**दिनांक :-** 28/11/2023
**स्थळ :-** **उमरखेड**

**कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**
**नांव :- प्रविणकुमार वानखडे**
**गट विकास अधिकारी (उ.श्रे.)**
**पंचायत समिती,उमरखेड**

## प्रस्तावना :-

"गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न" हा नवोपक्रम सादर करताना मनस्वी आनंद होतोय. कारण जे ठरवलं ते लगेच साध्य होत नाही. पण मला मात्र त्याचा चांगला अनुभव आला. जे ठरवलं ते साध्य झालं. आनंद आणि समाधान दोन्ही बाबी एकत्र अनुभवायला मिळाल्या.

मानवी विकासाला सर्वार्थाने यशस्वीतेची जोड देण्याची पायरी म्हणजे शिक्षण होय. प्रत्येक देशाचा सर्वार्थाने विकास हा शिक्षणावर अवलंबून आहे असे म्हटले जाते, नव्हे तर हे खरेच आहे आणि शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी प्रत्येक देशामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे प्रयोग तसेच नवनवीन संकल्पनांचा वापर करून आपल्या देशाच्या प्रगतीस हातभार लावला जातो . "कोणत्याही देशाचा सर्वार्थाने विकास साधवायचा असल्यास तेथील शैक्षणिक संरचनेमध्ये अमुलाग्र बदल घडून आणणे गरजेचे असते" . यालाच मुलाधार मानून शैक्षणिक क्षेत्रामध्ये काहीतरी बदल घडवण्याचा दृष्टिकोन समोर ठेवून प्राथमिक शिक्षणामध्ये पारंपरिक पद्धतीने चालत आलेल्या शिक्षण प्रणाली सोबतच आधुनिकतेची जोड देण्याचा विचार मनामध्ये आला. आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शाळांमध्ये प्राथमिक स्तरावरील मुलांचा पाया भक्कम होणे गरजेचे वाटले यातूनच एक नवीन विचार मनाशी बाळगून त्याचा आराखडा तयार केला. प्रत्येक गटशिक्षणाधिकारी यांची इच्छा असते कि आपली पंचायत समिती,आपला तालुका गुणवत्तेच्या दृष्टीने महाराष्ट्रात अव्वल असावा. त्यासाठी ते अहोरात्र झटत असतात. काही वेळेस यश येते तर काही वेळेस अपयशाला सामोरे जावे लागते. तसेच भारताला जागतिक महासत्ता बनवने हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे अंतिम ध्येय आहे या ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्न करणे गरजेचे होते.

कोणतेही प्रयत्न म्हटलं की त्याची सुरुवात ही भक्कम पायापासूनच होत असते आणि तोच भक्कम पाया म्हणजे शिक्षणातील प्राथमिक स्तर होय. याच प्राथमिक गटातील मुलांचा वाचन लेखन व संख्यावरील क्रिया यालाच आपण मुलांचा पाया म्हणतो. हाच मुलांचा पाया पक्का करण्याच्या दृष्टिकोनातून मिशन अक्षर,वाचन व लेखन नावाची संकल्पना उदयास उदयास आली. याच संकल्पनेच्या पायऱ्या म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शारीरिक मानसिक बौद्धिक व सामाजिक विकास साधला गेला त्याचबरोबर मुलांचे कला व क्रीडा कौशल्य आणि स्पर्धा परीक्षांचे ज्ञान आत्मसात झाले यातूनच एका नव्या विचाराची जोड घेऊन 'गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न' नावाचे वटवृक्ष उदयास आले…….

## नवोपक्रमाची गरज व महत्व

जग कोरोनासारख्या अनभिज्ञ अशा एका महाभयंकर महामारीच्या परिस्थितीचा नेटाने सामना करत होते.यात सर्वात जास्त नुकसान शिक्षणाचे झाले पर्यायने स्वतःला या महामारीच्या विळख्यातून सावरणे ही प्रथमांत गरज होऊन बसली होती. महामारीतून स्वतःला वाचवण्यासाठी त्याचबरोबर आपल्या सर्वांचे संरक्षण व्हावे म्हणून देशातील सर्वच शाळा बंद ठेवण्याचा निर्णय शासनाला नाईलाजाने घ्यावा लागला. तरीही अशा परिस्थितीत मुलं शिक्षणापासून दुरावू नये म्हणून शिक्षकांचे ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून नानाप्रकारचे प्रयत्न सुरूच होते.यात मुले शाळेच्या व शिक्षकांच्या संपर्कात होती पण , गुणवत्ता कुठेतरी ढासळली होती हे मान्य करावे लागेल. यावर तोडगा काय काढावा ? कमी वेळेत मुलांची गुणवत्ता पूर्वपदावर ,किंबहुना वरच्या स्तरावर कशी जाईल? यासाठी प्रभावी प्रयत्न कसे करता येतील यावर विचार होणे गरजेचे होते.

उमरखेड सारख्या पैनगंगा अभयारण्याच्या पायथ्याशी असलेल्या दुर्गम व डोंगराळ तालुक्यातील भौतिक परिस्थिती पाहता येथील भागाचा अभ्यास केल्यानंतर लक्षात आले. तालुक्यातील सर्वच भागामध्ये ऑनलाईन सारख्या शिक्षणाचे प्रयोग शंभर टक्के यशस्वी झाले असे म्हणता येणार नाही सर्वांगाने गुणवत्ता सुधारली असेही म्हणता येणार नाही अशी परिस्थिती होती त्यातूनच गुणवत्तेचे समीकरण जोडण्यासाठी कुठेतरी नाविन्यपूर्ण उपक्रमाची आवश्यकता भासली . या विचारातून गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न ही संकल्पना मनात आली आणि त्याला मूर्त रूप देण्याचे नियोजन करण्यात आले. कधीतरी मनात बाळगलेल्या आधीच्या कल्पनेला वास्तवाची जोड देऊन मिशन अक्षर वाचन व लेखन तसेच १०० टक्के शाळा भेट कार्यक्रम राबवून गुणवत्तेचा एक नवा पॅटर्न सुरु केला..

## i) उपक्रम निवडण्याचे कारण :-

शिक्षणक्षेत्रात कार्य करण्याची इच्छा शालेयस्तरावर शिक्षण घेत असतानापासुनच मनात होती. त्याच वेळी मोठे होऊन अधिकारी व्हायचे, शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल करायचे, वेगवेगळे उपक्रम राबवायचे ही कल्पना मनात घर करुन होती. MPSC पास झाल्यावर शिक्षण क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. पंचायत समिती उमरखेड येथे गटशिक्षणाधिकारी पदी रुजू झालो. त्यापुर्वी SCERT येथे प्रशिक्षण सुरु असताना तेथून मला

मिळालेल्या प्रशिक्षणामुळे माझ्या मनातील कल्पनेला जोड मिळाली ती सकारात्मक विचारांची. माझ्या मनातील अमूर्त कल्पना त्या प्रशिक्षणातच मूर्त रुपात यायला सुरुवात झाली असे म्हणावे लागेल.

यवतमाळ जिल्ह्यातील पंचायत समिती उमरखेड येथे रुजू झाल्यानंतर लगेच तालुक्यातील ४० ते ६० शाळांना भेटी दिल्या. प्रशासकीय कामे पुर्ण करत शाळास्तरावरील गुणवत्ता व तिथे शिक्षण घेणाऱ्या गरीब, सर्वसामान्य विद्यार्थ्यांनसोबत, पालकांसोबत तसेच शिक्षकांसोबत संवाद साधुन अडचणी ऐकून घेतल्या. आणि इथेच कल्पना प्रत्यक्षात उतरवण्याचे पक्के झाले.

## ii) उपक्रमाची गरज :-

पंचायत समिती उमरखेडच्या गटशिक्षणाधिकारी पदावर रुजू होताच ४०-६० शाळांना भेटी दिल्यानंतर गुणवत्तेवर काम करणे खुप आवश्यक होते. या भेटीदरम्यान खालील बाबी प्रकर्षाने जाणवल्या.

- कोरोनाकाळातील शैक्षणिक नुकसानीचे परिणाम,
- जवळ जवळ 90 किलोमीटर एवढा असणारा तालुक्याचा भौगोलिक विस्तार
- पैनगंगा नदीने वेढलेला अभयारण्य व जंगली भाग यामध्ये असणारी वाहतुकीची असुविधा
- उदरनिर्वाहासाठी ऊसतोड कामगार, वीट भट्टी कामगार व कापूस वेचणी सारख्या कामामुळे पालकांचे होणारे स्थलांतर व विद्यार्थ्यांची गळती यामुळे निर्माण झालेली शिक्षणाविषयीची उदासीनता.
- तालुक्यातील एकंदरीत 171 जिल्हा परिषद शाळांमध्ये 225 शिक्षकांची असणारी रिक्त पदे व त्याचा होणारा शालेय शिक्षणावर विपरीत परिणाम.
- शिक्षकांना प्रोत्साहित करण्याची व स्वातंत्र्य देण्याची गरज,
- शिक्षकांवरील अतिरिक्त अशैक्षणिक कामांचा बोजा,
- केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हा परिषदा यांचा विद्यार्थ्यांवर होणारा उपक्रमांचा व परीक्षांचा भडीमार,
- डोंगराळ व ग्रामीण भागातील पालकांची निरक्षरता व व्यसनाधीनता.
- भौतिक सुविधांचा अभाव,
- मुलींच्या शिक्षणाबाबत ची उदासीनता

या व अशा अनेक गोष्टींमुळे तसेच त्यात यवतमाळ जिल्हा LPD : LOW PARFORMING DISTRICT म्हणून देशातील कमी गुणवत्तेच्या दहा जिल्ह्यांच्या यादीमध्ये आल्यामुळे गुणवत्तेवर परिणामकारक काम होणे

अत्यंत गरजेचे  व क्रम प्राप्त होते.भारतातील सर्व राज्यांनी आदर्श घ्यावा असे शैक्षणिक धोरण राबवुन वेगवेगळे पॅटर्न महाराष्ट्राने देशासमोर ठेवले होते. त्याच प्रगत महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हा LPD मधे आला.  ही बाब नक्कीच अंतर्मुख करणारी  होती व माझ्यासारख्या काहीतरी विलक्षण करू पाहणाऱ्या मनाला मिळालेली एक प्रकारची पर्वणीच म्हणावी लागेल. वरील परिस्थितीचा सारासार विचार करून सतत नेहमी मनाला पोहोचत असणारी  नाविन्यतेची ओढ एका नवीन  प्रयोगाकडे घेऊन जात होती आणि तोच प्रयोग आज प्रत्यक्षात उतरवता आला. त्यालाच आपण गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न म्हणून ओळखू लागलो.

## iii) उपक्रमाचे वेगळेपण :-

पंचायत समिती उमरखेड येथे रुजू झाल्यानंतर अनेक उपक्रम राबवण्याचे मनाने ठरवलेच होते. परंतु पारंपरिक पद्धतीने विद्यार्थ्यांना फक्त अध्यापन करणे हा विषय बाजूला ठेवून त्यांचा सर्वांगीण विकास, त्यांची मानसिकता, त्यांची क्षमता या सर्व बाबी लक्षात घेऊन काहीतरी नवीन परंतु आखून दिलेल्या साच्यात म्हणजेच त्या वर्गाच्या अध्ययन क्षमता मुलांनी प्राप्त केल्याच पाहिजेत हा मूळ उद्देश सोबत घेऊन आम्ही **गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न** हा उपक्रम हाती घेतला.

▪ त्या अंतर्गत मिशन अक्षर, वाचन व लेखन या  उपक्रमांतर्गत मुलांचा पायाभूत स्तर याचे मूल्यांकन करून जो ज्या स्तरावर आहे त्या स्तरावरून पुढे येण्यासाठी त्याला पूरक अध्ययन व जादा तास घेऊन पुढच्या स्तरावर आणण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली.

▪ एका महिन्यात 195 शाळांचे मुल्यांकन करण्यात आले  आणि त्यातील 18000 विद्यार्थ्यांचे  मूल्यांकन करण्यात आले.

▪  त्याच एका महिन्यात केंद्रनिहाय 15 आढावा सभेत तालुक्यातील 825+ शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले.

▪ चार प्रकारचे प्रपत्र

1) भाषा वाचन त्यात अक्षर वाचन, शब्दवाचन, जोडाक्षरयुक्त शब्द वाचन, वाक्यवाचन व उतारावाचन असे मुद्दे होते.
2) भाषा लेखन यात अक्षरलेखन, शब्द लेखन, जोडाक्षरयुक्त शब्द लेखन, वाक्य लेखन व उतारा लेखन असे मुद्दे होते.

3) तर गणित विषयात संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार व शाब्दिक उदाहरणे यांचा समावेश होता.

4) शाळेतील भौतिक सुविधा माहिती संकलन प्रपत्र.

त्याच बरोबर **महादीप : यवतमाळ जिल्हा परिषदेने राबवलेला एक अभिनव उपक्रम ज्यात जिल्हा परिषद शाळेत शिकत असलेल्या पाचवी ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांची शाळा, केंद्र, तालुका व जिल्हा अशा वेगवेगळया स्तरावर एकंदरीत सात फेऱ्या ची परीक्षा देऊन अंतिम परीक्षेसाठी पात्र झाल्यानंतर घेतल्या जाणाऱ्या जिल्हास्तरावरील अंतिम परीक्षेतून गुणानुक्रमे निवड झालेल्या एकूण 55 विद्यार्थ्यांची दिल्ली, चंदीगड ,शिमला अशा शहरांमध्ये विमानवारीने विद्यार्थ्यांचा प्रवास घडवला जातो व एक अभिनव असा नाविन्यपूर्ण अनुभव विद्यार्थ्यांना प्रत्यक्षरीत्या घडवला जातो.**

**नवोदय, स्कॉलरशिप, NMMS, क्रीडा स्पर्धा, आदर्श परिपाठ, शालेय पोषण आहार, भौतिक सुविधा** अशा एक ना अनेक उपक्रमांचा यात समावेश केला. फक्त लेखन वाचन व आकडेमोड यावरच भर न देता मुलांच्या सर्वांगीण विकासावर, शारीरिक, मानसिक, शैक्षणिक क्षमताविकासावर जातीने लक्ष घालून विद्यार्थ्यांना शाळेविषयी व शिक्षणाविषयी गोडी लागावी यासाठी प्रयत्न करण्यात आले. यावेळी शासन स्तरावरून आलेला आदेश न डावलता प्रत्यक्ष शाळा स्तरावर शिक्षक व विद्यार्थी यांच्या भेटी घेऊन स्वत: आम्ही मूल्यांकन केले व मार्गदर्शनही केले यामुळे या उपक्रमाचे वेगळेपण प्रभावीपणे जाणवते. गट साधन केन्द्रातील सर्व विषय तज्ञ, साधन शिक्षक ,साधन व्यक्ती पंचायत समितीमध्ये कार्यरत सर्व केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, शा.पो.आ. अधीक्षक तसेच स्वतः गटशिक्षणाधिकारी या सर्वांनी अतिशय गोपनीयपणे प्रत्येक शाळेची भेट घेऊन शंभर टक्के विद्यार्थ्यांचे मूल्यांकन केले हीच बाब या उपक्रमाचे वेगळेपण दाखवते.

## iv) उपक्रमाची उपयुक्तता :-

कोरोनामुळे जगभरातील विद्यार्थ्यांचे आतोनात शैक्षणिक नुकसान झाले होते. माझ्या शाळाभेटीदरम्यान मलाही गुणवत्तेवर व मुलांच्या अंगभूत कौशल्यावर आधारित उपक्रम राबविण्याची गरज भासली. म्हणून मी नियोजन करुन हा कार्यक्रम सुरू केला.

या कार्यक्रमाची उपयुक्तता म्हणजे

- शिक्षकांना स्वातंत्र्य मिळेल.
- विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात शिकायला मिळेल.

▪ विद्यार्थी वाचन,लेखन व गणनक्रियेत प्रावीण्य मिळवतील.

▪ विद्यार्थ्यांमधील अंगभूत कौशल्य विकसित होतील.

▪ विद्यार्थ्यांमधे आत्मविश्वास निर्माण होऊन सभाधिटपणा वाढण्यास मदत होईल.

▪ वाचन, लेखन व गणन या सोबतच, कला, क्रिडा या प्रकारात आवड असणारे विद्यार्थी निपुण होतील.

▪ एकंदरीत सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

▪ जिल्हा परिषद शाळांना पूर्वीप्रमाणे गतवैभव प्राप्त होऊन पालकांचा शाळेप्रती विश्वास वाढेल.

▪ शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञानाचा अनुभव येईल व भविष्यातील कोणत्याही संकटांना तोंड देण्याची क्षमता निर्माण होईल.

▪ विद्यार्थी शिक्षक व अधिकारी यांच्यातील परस्पर संभाषणातील आंतरक्रिया वाढीस मदत होईल.

वरील प्रमाणे या उपक्रमाची उपयुक्तता आहे.

## ३) नवोपक्रमाची उद्दिष्टे :-

▪ विद्यार्थ्यांचा सर्वांगीण शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, कलात्मक, क्रिडा विकास करणे.

▪ निपुण भारत व FLN ची उद्दीष्टे साध्य करणे.

▪ LPD मधून लवकर बाहेर पडणे.

▪ दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणने.

▪ शिक्षकांवरील विश्वास वृद्धिंगत करणे.

▪ होतकरू शिक्षकांना प्रोत्साहित करणे.

▪ उमरखेड तालुका गुणवत्तेत अव्वल आणणे.

▪ स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग वाढवून यश मिळवणे.

▪ पालक व शिक्षक यांच्यासह विद्यार्थ्यांनसोबत सकारात्मक सुसंवाद वाढवणे.

▪ गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना देणे.

## ४) नवोपक्रमाचे नियोजन :-

### १) उपक्रमपुर्व स्थितीचे निरीक्षण

उपक्रम हाती घेण्यापुर्वी 40 ते 60 शाळांना सहज भेटी देऊन काही निरिक्षणे केली होती. त्यात अनेक महत्त्वपूर्ण व गंभीर बाबी लक्षात आल्या. सर्वात मोठा प्रभाव होता कोरोनाचा कोरोना सारखी महामारीवर आपण मात केलीच पण त्या महामारीचे व्रण आणि भयंकर आठवणी अजुनही प्रभावित करत होत्या. त्या काळात आलेली मरगळ स्पष्ट जाणवत होती. ती प्रामुख्याने दुर करणे क्रमप्राप्त होते.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, निपुण भारत, FLN अभियानांतर्गत असलेले मार्गदर्शक मुद्दे उपक्रमासाठी उपयुक्त ठरले. पायाभुत अध्ययन कौशल्यावर भर देणे गरजेचे होते. अनेक शाळांमध्ये शिक्षक काम करण्यास उत्सुक वाटले. ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती तसेच पालक सहकार्य करणारे दिसले. शालेय परिसर काही ठिकाणी अतिशय सुंदर तर काही ठिकाणी उदासीनता भासली. भौगोलिक विस्तार जास्त असल्याने वाहतुकीची अडचण होतीच. त्यामुळे शहरातील सुविधा ग्रामीण भागापर्यंत पोहचत नव्हत्या.

अनेक शिक्षक स्वता विद्यार्थ्यांनसोबत सकारात्मक सुसंवाद साधून स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य तयार करुन अध्यापन करताना आढळले. त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज होती.

### २) संबंधित व्यक्तिंशी, तज्ज्ञांशी चर्चा

हा उपक्रम राबविण्यापुर्वी उपक्रमात कोणत्याही त्रुटी राहू नयेत यासाठी परफेक्ट नियोजन तयार करायचे होते. त्यासाठी अनुभवी व वरिष्ठ व्यक्तींशी व तज्ञ व्यक्तिंशी चर्चा करुन मार्गदर्शन घेण्याचे ठरवले. यासाठी यवतमाळ जिल्हा परिषदेचे तात्कालिन शिक्षणाधिकारी प्रमोद सुर्यवंशी सर यांच्याशी चर्चा केली. पंचायत समिती उमरकेडचे शिक्षण विस्तार अधिकारी खांडरे साहेब, सर्व कार्यरत केन्द्रप्रमुख व BRC मधील सहकारी उपक्रमशील शिक्षक यांच्याशी सखोल चर्चा केली. चर्चेच्या अनेक फेऱ्या पुर्ण करुन चार प्रकारचे प्रपत्र तयार केले. आणि उपक्रम राबवण्यास सज्ज झालो.

### ३) आवश्यक साधनांचा विचार

जिल्हा मुख्यालयापासुन बऱ्याच अंतरावर उमरखेड तालुका आहे. त्यातच उमरखेड तालुक्यामध्ये कष्टकरी, पालकांची संख्या खुप आहे. कामासाठी गावापासून दूर पालक सहकुटुंब स्थलांतरित होतात. आर्थिक विवंचनेत असणाऱ्या पालकांकडून खुप अपेक्षा ठेवणे जमणारे नव्हते. शिक्षकांना अतिरिक्त कामाच्या भारासोबतच वेगवेगळे उपक्रम राबवुन त्याचे अहवाल देणे बंधनकारक असते. या व्यापात पाठ्यक्रम पुर्ण करतानाच त्यांना तारेवरची कसरत करावी लागत होती.

त्यामुळे शिक्षक बांधवांकडून आणखी वेगळी अपेक्षा करणे योग्य वाटत नव्हते. म्हणून आहे त्या साधनांचा प्रभावीपणे वापर करण्याचे ठरवले. त्यात भाषापेटी, गणितपेटी, इंग्रजी पेटी यांच्यासोबत विविध कृतीपुस्तीका शिक्षक स्वनिर्मित शैक्षणिक साधनेही उपयुक्त ठरली.

शिक्षक बांधवांवर विश्वास ठेऊन त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यासाठी WHAT'S APP, ZOOM यासारख्या माध्यमांचा उपयोग केला.

**४) करावयाच्या कृतींचा क्रम**

- उपक्रमाचे नियोजन
- उपक्रमाच्या नियोजनाचे सादरीकरण व सुरुवात
- प्रत्यक्ष उपक्रमास सुरुवात.
- पूर्वकल्पना न देता 15 केंद्रातील सर्व शाळांना भेटी.
- परिपाठात उपस्थीती, निरीक्षण व मार्गदर्शन.
- प्रत्यक्ष मुल्यांकन 4 प्रकारचे प्रपत्र
- भौतिक सुविधांवर लक्ष
- स्वनिर्मित शैक्षणिक साहित्याचे संदर्भात मार्गदर्शन
- स्पर्धा परीक्षा तयारी आढावा
- मुल्यांकनानंतर केन्द्रातील सर्व शिक्षकांची आढावा बैठक
- शिक्षकांनी केलेल्या चांगल्या कामाचे कौतुक तर कमतरतेसंदर्भात बैठकीत मार्गदर्शन.
- प्रथम मूल्यांकनाअंती असलेल्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत

मध्यावधी मूल्यांकन,आढावा व सूचना.

- अंतिम मुल्यांकन
- अंतिम मूल्यांकनानंतर तालुक्यातील सर्वोत्तम गुणवत्ता संपादित प्रथम सात शाळा त्याचबरोबर प्रत्येक केंद्रातील उत्कृष्ट गुणवत्ता संपादित प्रथम 3 क्रमांकाचे तीन शाळा व उत्कृष्ट तीन केंद्र यांचा यथोचित सन्मान

**५) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण**

उमरखेड तालुक्यातील शाळेमध्ये मुलांकनाच्या पूर्वी असलेली गुणवत्ता आणि मूल्यांकनाअंती असणारी गुणवत्ता यात भरघोस वाढ झाली . त्याच प्रकारे महादीप परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण मागच्या वर्षीच्या तुलनेत वाढले. पाचवी व आठवीचा स्कॉलरशिप मध्ये शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी संख्येत सुद्धा लक्षणीय वाढ दिसून आली . राष्ट्रीय स्तरावरील घेतली जाणारी एन एम एम एस परीक्षेत उमरखेड मधील विद्यार्थ्यांनी लक्षणीय यश मिळवून 13 लाख रुपयांची शिष्यवृत्ती स्वरूपी रक्कम मिळविली. कर्मचारी क्रीडा स्पर्धेत व विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धेत जिल्हास्तरावर सर्वसाधारण उपविजेतेपद मिळवलं. एकंदरीत उमरखेडच्या सर्वांगीण गुणवत्तेमध्ये भरघोस वाढहोऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली व कोरोनाच्या कालखंडामध्ये आलेल्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन पठारावस्थेला पूर्णविराम मिळाला आणि अशाप्रकारे गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न यशस्वी झाला .

**६) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)**

- शाळाभेट
- प्रथम मुल्यांकन
- मार्गदर्शक सुचना
- कौतुक व सुचना
- कार्यवाहीसाठी मुदत
- मध्य मुल्यांकन
- अंतिम मुल्यांकन
- माहिती संकलन

तालुक्यातील प्रथम सात शाळा

- केन्द्रातील प्रथम तीन शाळा

▪ तालुक्यातील प्रथम तीन केन्द्र

▪ कमी पट व जास्त पटाच्या तीन शाळा

▪ सर्वांच्या कामाचे गुरुगौरव सोहळयात सन्मान व सन्मान रॅली

**७) उपक्रमासाठी इतरांची मदत**

उपक्रम राबवताना विविध साहित्याची, मानव बळाची आवश्यकता होती. विशेष मदत मिळाली सुद्धा. **ह्युमाना सामाजिक संस्थे**तर्फे शिक्षण क्षेत्रात काम सुरु होते. तसेच**कदम** उपक्रम सुरु होता. मुलांच्या सरावासाठी आवश्यक असणारी पुस्तके त्यांच्याकडून आम्हाला मिळाली.ज्यात पायाभूत गुणवत्तेवर भरीव काम करण्यात येणार होते. इयत्तानिहाय बेसलाईन चाचणी घेऊन त्यांच्या अध्ययन निष्पत्तीवर काम सुरू झाले.

**८) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे**

व्हिडिओ,फोटो व युट्युब लिंक

**५) नवोपक्रमाची कार्यपद्धती :-**

**१) पुर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी**

मिशनची सुरुवात झाल्यानंतर प्रथम मूल्यांकन 12 सप्टेंबर ते 12 ऑक्टोबर या या 30 दिवसांमध्ये करण्यात आले. तीस दिवसातील 195 शाळांना विजीट करून जे पायाभूत मूल्यांकन करण्यातआले त्यामध्ये 18000 विद्यार्थ्यांचे मूल्यांकन केल्यानंतर तालुक्याची गुणवत्ता स्थिती पुढील प्रमाणे होती .

**वाचन स्थिती**

मुळाक्षरावर पंधराशे सतरा विद्यार्थी स्वरचिन्हरहीत शब्दांमध्ये 2154 विद्यार्थी जोडाक्षर युक्त शब्दांमध्ये 1360 विद्यार्थी वाक्य वाचन मध्ये 1593 विद्यार्थी उतारा वाचन मध्ये 1634 विद्यार्थी आणि समज पूर्वक वाचन मध्ये 2718 विद्यार्थी होते .याचे एकंदरीत विश्लेषण केल्यास 35 ते 40%च विद्यार्थी स्पष्टपणे वाचू शकत होती.

**लेखन स्थिती**

मुळाक्षरावर 1707 विद्यार्थी संरचना रहित शब्दांमध्ये 3132 विद्यार्थी जोडाक्षर युक्त शब्दांमध्ये 2471 विद्यार्थी आणि वाक्य लेखन मध्ये 3617 विद्यार्थी होते. म्हणजे 35 ते 40 टक्के टक्केच विद्यार्थी चांगल्या प्रकारे लिखाण करू शकत होती

**गणित स्थिती**

संख्या ज्ञानावर 8581 विद्यार्थी बेरजेवर 7881 विद्यार्थी वजाबाकी वर 6529 विद्यार्थी गुणाकारावर 4685 विद्यार्थी भागाकारावर 3226 विद्यार्थी आणि शाब्दिक उदाहरणांमध्ये 2371 विद्यार्थी होते. येथे सुद्धा जवळपास 40%च विद्यार्थी प्रगत होते.

**२) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन.**

प्रथम मूल्यांकन झाल्यानंतर आढावा सभेच्या माध्यमातून शिक्षकांना त्यांच्या वर्गाची स्थिती कळवण्यात आली व पुढील तीन ते चार महिन्यांमध्ये करावयाच्या कारवाई संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर दीड ते दोन महिन्यानंतर मध्यवर्ती आढावा घेऊन विद्यार्थ्यांची प्रगती तपासण्यात आली तेव्हा प्रत्येक स्तरावर जवळपास 15% विद्यार्थी प्रगत झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अधिक जोमाने काम करण्यासंदर्भात सर्व शिक्षकांना सूचना देण्यात आल्या. अधिक जोमाने काम करून ठरवलेले लक्ष पूर्ण करणं संदर्भामध्ये शिक्षकांमध्ये विश्वास निर्माण करण्यात आला

**३) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी**

**अंतिम वाचन स्थिती**

अंतिमतः मुळाक्षरांमध्ये 460 विद्यार्थी संरचना रहित शब्दांमध्ये 1165 विद्यार्थ जोडाक्षर युक्त शब्दामध्ये एखादा 1316 विद्यार्थी वाक्य वाचन मध्ये एखादा 1648 विद्यार्थी उतारा वाचन मध्ये 2119 विद्यार्थी आणि समाज पूर्वक वाचन मध्ये 4984 विद्यार्थी आले. याचे विश्लेषण केल्यास असे आढळते की पायाभूत स्तरावर जेव्हा मूल्यांकन करण्यात आले तेव्हा समोर पूर्व पचनमध्ये 2718 विद्यार्थी म्हणजे 25% विद्यार्थी होते तर अंतिम मूल्यांकनामध्ये 4984 विद्यार्थी म्हणजे जवळपास 43% विद्यार्थी आढळून आले. उतारा वाचन व समाज पूर्वक वाचन ची टक्केवारी एकत्र केली तर जवळपास 70 टक्के विद्यार्थी हे समज पूरक वाचन मध्ये आलेली होती ही एक प्रकारे विद्यार्थी गुणवत्तेमध्ये आढळून आलेली एक मोठी वाढ दिसून आली.

**अंतिम लेखन स्थिती**

अंतिमतः लेखनामध्ये मुळाक्षरे ६२८ स्वरचिन्ह रहित शब्दांमध्ये 2031 जोडाक्षर युक्त शब्दांमध्ये 3080 आणि वाक्य लेखनामध्ये 6176 विद्यार्थी आढळून आले. पायाभूत गुणवत्ता तपासणीच्या वेळेस 3617 विद्यार्थी हे वाक्यलेखनामध्ये होती तर अंतिम मूल्यांकनामध्ये 6,176 विद्यार्थी झाली म्हणजे गुणवत्तेमध्ये दुप्पटीने वाढ घडून आली व अशा प्रकारे 65 ते 70 टक्के विद्यार्थी चांगल्या प्रकारे लिखाण करू लागली.

**अंतिम गणित स्थिती**

अंतिम मुलांकनाच्या वेळी संख्या ज्ञान मध्ये 88% विद्यार्थी बेरजेमध्ये 86% विद्यार्थी वजाबाकी मध्ये 79 टक्के विद्यार्थी गुणाकारांमध्ये 65% विद्यार्थी भागाकारामध्ये 50% विद्यार्थी आणि शाब्दिक उदाहरणांमध्ये 40% विद्यार्थी आढळून आले. पायाभूत स्तरावरील गुणवत्ता व अंतिम गुणवत्ता यामध्ये जर फरक बघितला तर दुप्पटीने वाढ घडून आली.

अशाप्रकारे मनामध्ये घेऊन जे एक गुणवत्तेच मिशन बघितलं होतं तालुक्याची गुणवत्ता 70 ते 75 टक्के आणून शेवटी गुणवत्तेचे मिशन यशस्वी करण्यात आले याचा मनस्वी आनंद आहे.वाचन लेखन व गणिती क्रिया या तीनही स्तरावर मोठ्या प्रमाणामध्ये वाढ घडून आली .

**४) कार्यवाही करताना आलेल्या अडचणी**

उपक्रम राबवताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. उमरखेड तालुक्याची भौगोलिक विस्तार व असमतोल पाहता वाहतुकीच्या दृष्टीने खुपच अडचणी होत्या. सोबतच मजूर व कष्टकरी लोकांची संख्या खुप असल्याने स्थलांतर हा मुद्दा विशेष काम करण्यास अडचणीचा ठरला.

- भौतिक सुविधांचा आभाव
- पालकांची उदासिनता
- अतिरिक्त कामांचा भार
- पटसंखेनुसार शिक्षकांची कमतरता
- शैक्षणिक साहित्याची कमतरता
- विद्यार्थ्यांनसोबत संवाद

५) माहितीचे विश्लेषण :

## तक्ते-

## वाचन    तालुका स्थिती

| वर्ग | चाचणी | वाचन | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुळाक्षर | टक्केवारी | स्वरचिन्ह रहित शब्द | टक्केवारी | जोडाक्षरक्त शब्द | टक्केवारी | वाक्य वाचन | टक्केवारी | उतारा | टक्केवारी | समजपूर्वक वाचन | टक्केवारी |
| ३ | पायाभूत | 618 | 25.22 | 750 | 30.61 | 332 | 13.55 | 306 | 12.49 | 257 | 10.49 | 249 | 10.16 |
| | अंतिम | 216 | 8.17 | 420 | 15.89 | 365 | 13.81 | 398 | 15.06 | 503 | 19.03 | 764 | 28.91 |
| ४ | पायाभूत | 432 | 16.53 | 571 | 21.84 | 307 | 11.74 | 409 | 15.65 | 338 | 12.93 | 516 | 19.74 |
| | अंतिम | 162 | 5.82 | 379 | 13.62 | 355 | 12.76 | 411 | 14.77 | 494 | 17.75 | 940 | 33.78 |
| ५ | पायाभूत | 231 | 12.24 | 356 | 18.87 | 225 | 11.92 | 288 | 15.26 | 279 | 14.79 | 508 | 26.92 |
| | अंतिम | 32 | 1.56 | 171 | 8.35 | 247 | 12.07 | 276 | 13.48 | 402 | 19.64 | 920 | 44.94 |
| ६ | पायाभूत | 128 | 7.57 | 247 | 14.61 | 226 | 13.36 | 300 | 17.74 | 333 | 19.69 | 477 | 28.21 |
| | अंतिम | 35 | 1.92 | 90 | 4.93 | 179 | 9.81 | 270 | 14.80 | 391 | 21.44 | 869 | 47.64 |
| ७ | पायाभूत | 93 | 5.88 | 190 | 12.02 | 202 | 12.78 | 208 | 13.16 | 277 | 17.52 | 644 | 40.73 |
| | अंतिम | 12 | 0.69 | 88 | 5.03 | 125 | 7.14 | 233 | 13.31 | 317 | 18.10 | 988 | 56.42 |
| ८ | पायाभूत | 15 | 2.19 | 40 | 5.84 | 68 | 9.93 | 82 | 11.97 | 150 | 21.90 | 324 | 47.30 |
| | अंतिम | 3 | 0.40 | 17 | 2.28 | 45 | 6.02 | 60 | 8.03 | 112 | 14.99 | 503 | 67.34 |
| एकूण | पायाभूत | 1517 | 13.91 | 2154 | 19.75 | 1360 | 12.47 | 1593 | 14.60 | 1634 | 14.98 | 2718 | 24.92 |
| | अंतिम | 460 | 3.90 | 1165 | 9.88 | 1316 | 11.16 | 1648 | 13.97 | 2219 | 18.81 | 4984 | 42.26 |

**पायाभूत - ऑक्टोबर 2022 ची गुणवत्ता स्थिती**

## लेखन

## तालुका स्थिती

| वर्ग | चाचणी | लेखन | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुळाक्षर | टक्केवारी | स्वरचिन्ह रहित शब्द | टक्केवारी | जोडाक्षरक्त शब्द | टक्केवारी | वाक्यलेखन | टक्केवारी |
| ३ | पायाभूत | 679 | 27.71 | 855 | 34.90 | 434 | 17.71 | 498 | 20.33 |
| | अंतिम | 275 | 10.40 | 639 | 24.18 | 688 | 26.03 | 1068 | 40.41 |
| ४ | पायाभूत | 504 | 19.28 | 818 | 31.29 | 571 | 21.84 | 707 | 27.05 |
| | अंतिम | 204 | 7.33 | 609 | 21.88 | 737 | 26.48 | 1297 | 46.60 |
| ५ | पायाभूत | 244 | 12.93 | 575 | 30.47 | 382 | 20.24 | 702 | 37.20 |
| | अंतिम | 86 | 4.20 | 335 | 16.37 | 542 | 26.48 | 1113 | 54.37 |
| ६ | पायाभूत | 165 | 9.76 | 416 | 24.60 | 448 | 26.49 | 686 | 40.57 |
| | अंतिम | 43 | 2.36 | 239 | 13.10 | 536 | 29.39 | 1020 | 55.92 |
| ७ | पायाभूत | 108 | 6.83 | 367 | 23.21 | 461 | 29.16 | 647 | 40.92 |
| | अंतिम | 15 | 0.86 | 177 | 10.11 | 409 | 23.36 | 1136 | 64.88 |
| ८ | पायाभूत | 7 | 1.02 | 101 | 14.74 | 175 | 25.55 | 377 | 55.04 |
| | अंतिम | 5 | 0.67 | 32 | 4.28 | 168 | 22.49 | 542 | 72.56 |
| एकूण | पायाभूत | 1707 | 15.65 | 3132 | 28.71 | 2471 | 22.65 | 3617 | 33.16 |
| | अंतिम | 628 | 5.32 | 2031 | 17.22 | 3080 | 26.11 | 6176 | 52.36 |

## पायाभूत - ऑक्टोंबर 2022 ची गुणवत्ता स्थिती

## अंतिम - एप्रिल 2023 ची गुणवत्ता स्थिती

**गणित**


**तालुका स्थिती**

| वर्ग | चाचणी | गणित | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्याज्ञान | टक्केवारी | बेरीज | टक्केवारी | वजाबाकी | टक्केवारी | गुणाकार | टक्केवारी | भागाकार | टक्केवारी | शाब्दिक उदाहरणे | टक्केवारी |
| ३ | पायाभूत | 1974 | **80.57** | 1645 | **67.14** | 1238 | **50.53** | 724 | **29.55** | 245 | **10.00** | 204 | **8.33** |
| | अंतिम | 2308 | **87.33** | 2183 | **82.60** | 1891 | **71.55** | 1409 | **53.31** | 879 | **33.26** | 609 | **23.04** |
| ४ | पायाभूत | 2103 | **80.45** | 1835 | **70.20** | 1505 | **57.57** | 1075 | **41.12** | 729 | **27.89** | 466 | **17.83** |
| | अंतिम | 2482 | **89.18** | 2341 | **84.12** | 2168 | **77.90** | 1771 | **63.64** | 1215 | **43.66** | 859 | **30.87** |
| ५ | पायाभूत | 1532 | **81.19** | 1423 | **75.41** | 1185 | **62.80** | 836 | **44.30** | 638 | **33.81** | 498 | **26.39** |
| | अंतिम | 1882 | **91.94** | 1825 | **89.15** | 1687 | **82.41** | 1361 | **66.49** | 1049 | **51.25** | 825 | **40.30** |
| ६ | पायाभूत | 1271 | **75.16** | 1280 | **75.69** | 1068 | **63.16** | 807 | **47.72** | 595 | **35.19** | 374 | **22.12** |
| | अंतिम | 1586 | **86.95** | 1615 | **88.54** | 1537 | **84.27** | 1297 | **71.11** | 1057 | **57.95** | 824 | **45.18** |
| ७ | पायाभूत | 1189 | **75.21** | 1183 | **74.83** | 1033 | **65.34** | 856 | **54.14** | 681 | **43.07** | 518 | **32.76** |
| | अंतिम | 1444 | **82.47** | 1484 | **84.75** | 1401 | **80.01** | 1261 | **72.02** | 1043 | **59.57** | 890 | **50.83** |
| ८ | पायाभूत | 512 | **74.74** | 515 | **75.18** | 500 | **72.99** | 387 | **56.50** | 338 | **49.34** | 311 | **45.40** |
| | अंतिम | 659 | **88.22** | 651 | **87.15** | 631 | **84.47** | 561 | **75.10** | 586 | **78.45** | 659 | **88.22** |
| एकूण | **पायाभूत** | 8581 | **78.67** | 7881 | **72.25** | 6529 | **59.86** | 4685 | **42.95** | 3226 | **29.57** | 2371 | **21.74** |
| | **अंतिम** | 10361 | **87.84** | 10099 | **85.62** | 9315 | **78.97** | 7660 | **64.94** | 5829 | **49.42** | 4666 | **39.56** |

**पायाभूत - ऑक्टोंबर 2022 ची गुणवत्ता स्थिती**

**अंतिम - एप्रिल 2023 ची गुणवत्ता स्थिती**

आलेख- (पायाभूत व अंतिम गुणवत्ता दर्शक स्थिती )




| | पटावर विद्यार्थी | हजर | वाचन | | | | | | लेखन | | | | संख्याज्ञान | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुळाक्षर | स्वरचिन्ह रहित शब्द | जोडाक्षरयुक्त शब्द | वाक्य वाचन | उतारा | समजपूर्वक वाचन | मुळाक्षर | स्वरचिन्ह रहित शब्द | जोडाक्षरयुक्त शब्द | वाक्यलेखन | संख्याज्ञान | बेरीज | वजाबाकी | गुणाकार | भागाकार | शाब्दिक उदाहरणे |
| पायाभूत | 17045 | 14473 | 3531 | 3314 | 1558 | 1756 | 1667 | 2725 | 3853 | 4312 | 2619 | 3746 | 11274 | 9020 | 7251 | 4491 | 3068 | 2260 |
| अंतिम | 17007 | 15774 | 1119 | 2434 | 1870 | 2279 | 2701 | 5388 | 1456 | 3503 | 3829 | 7174 | 13604 | 12767 | 11382 | 7855 | 5572 | 4618 |

लिंक

https://youtube.com/playlist?list=PLzcP9pZ-1rxHw8MkEnOZIcpxsSQLU9rDc&si=PAaGG3WxaP2Z7Oil

फोटो

फोटो क्रमांक- ०१



फोटो क्रमांक- ०२


प्रत्यक्ष शाळा भेटीला सुरुवात
Shot on OnePlus
Shot on OnePlus
15/09/22
8:35 am

फोटो क्रमांक- ३


दत्तनगर शाळेत समूह नृत्य करतांना विद्यार्थी
मा. श्री. प्रवीणकुमार वानखेडे साहेब
गटविकास अधिकारी पं.स.उमरखेड
19/09/2022 11:52
दिव्यांग विद्यार्थ्याचे साधन शिक्षकांद्वारे मुल्यांकन
प्रत्यक्ष मुल्यांकन

फोटो क्रमांक- ४


195 शाळांची गुणवत्तेवर आढावा सभा
Redmi Note 10T 5G
19/09/2022 16:22
* शाळानिहाय विद्यार्थी स्तर
* शालेय परिसर
* भौतिक सुविधा
* भाषा, गणित पेटी अध्ययनात प्रत्यक्ष वापर
* शिक्षकांचे नाविन्यपूर्ण उपक्रम
* अध्ययन- अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर
* शिक्षकांना गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शन
* शिक्षकांच्या अध्ययन- अध्यापन विषयक समस्यांचे निराकरण
* समाजाचा प्रत्यक्ष सहभाग
* शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना मार्गदर्शन

फोटो क्रमांक- ५







फोटो क्रमांक- ६



## प्रपत्रे

# मुल्यांकन प्रपत्र

**६) नवोपक्रमाची यशस्वीता/फलनिष्पत्ती :-**

▪ **पायाभूत गुणवत्तेवर भरीव काम :** गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न अंतर्गत मिशन अक्षर, वाचन व लेखन आणि 100% शाळाभेट कार्यक्रम सुरु करुन जेव्हा प्रथम मूल्यांकन केले तेव्हाची व अंतिम मुल्यांकन वेळेच्या परिस्थितीत खुप विधायक बदल झाल्याचे दिसून आले. संख्या ज्ञानावरून बेरीज व वजाबाकी पर्यंतप्रगती प्रगती 40% पेक्षा कमी होती. तीच स्थिती भाषा वाचन व लेखन मध्ये दिसुन आली. म्हणजे 30 ते 35 टक्के गुणवत्ता असणाऱ्या शाळा आज रोजी 65 ते 70 टक्के पर्यंत गुणवत्ता वाढीसाठी काम केल्याचे स्पष्ट दिसून आली .

**अंतिम वाचन स्थिती**

अंतिमतः मुळाक्षरांमध्ये 460 विद्यार्थी संरचना रहित शब्दांमध्ये 1165 विद्यार्थ जोडाक्षर युक्त शब्दामध्ये एखादा 1316 विद्यार्थी वाक्य वाचन मध्ये एखादा 1648 विद्यार्थी उतारा वाचन मध्ये 2119 विद्यार्थी आणि समाज पूर्वक वाचन मध्ये 4984 विद्यार्थी आले. याचे विश्लेषण केल्यास असे आढळते की पायाभूत स्तरावर जेव्हा मूल्यांकन करण्यात आले तेव्हा समोर पूर्व पचनमध्ये 2718 विद्यार्थी म्हणजे 25% विद्यार्थी होते तर अंतिम मूल्यांकनामध्ये 4984 विद्यार्थी म्हणजे जवळपास 43% विद्यार्थी आढळून आले. उतारा वाचन व समाज पूर्वक वाचन ची टक्केवारी एकत्र केली तर जवळपास 70 टक्के विद्यार्थी हे समज पूरक वाचन मध्ये आलेली होती ही एक प्रकारे विद्यार्थी गुणवत्तेमध्ये आढळून आलेली एक मोठी वाढ दिसून आली.

**अंतिम लेखन स्थिती**

अंतिमतः लेखनामध्ये मुळाक्षरे ६२८ स्वरचिन्ह रहित शब्दांमध्ये 2031 जोडाक्षर युक्त शब्दांमध्ये 3080 आणि वाक्य लेखनामध्ये 6176 विद्यार्थी आढळून आले. पायाभूत गुणवत्ता तपासणीच्या वेळेस 3617 विद्यार्थी हे वाक्यलेखनामध्ये होती तर अंतिम मूल्यांकनामध्ये 6,176 विद्यार्थी झाली म्हणजे गुणवत्तेमध्ये दुप्पटीने वाढ घडून आली व अशा प्रकारे 65 ते 70 टक्के विद्यार्थी चांगल्या प्रकारे लिखाण करू लागली.

**अंतिम गणित स्थिती**

अंतिम मुलांकनाच्या वेळी संख्या ज्ञान मध्ये 88% विद्यार्थी बेरजेमध्ये 86% विद्यार्थी वजाबाकी मध्ये 79 टक्के विद्यार्थी गुणाकारांमध्ये 65% विद्यार्थी भागाकारामध्ये 50% विद्यार्थी आणि शाब्दिक उदाहरणांमध्ये 40% विद्यार्थी आढळून आले. पायाभूत स्तरावरील गुणवत्ता व अंतिम गुणवत्ता यामध्ये जर फरक बघितला तर दुप्पटीने वाढ घडून आली.

अशाप्रकारे मनामध्ये घेऊन जे एक गुणवत्तेच मिशन बघितलं होतं तालुक्याची गुणवत्ता 70 ते 75 टक्के आणून शेवटी गुणवत्तेचे मिशन  यशस्वी करण्यात आले याचा मनस्वी आनंद आहे.वाचन लेखन व गणिती क्रिया या तीनही स्तरावर मोठ्या प्रमाणामध्ये वाढ घडून आली .

▪ **शिक्षकांना पायाभूत गुणवत्तेवर काम करताना स्वातंत्र्य मिळाले:**

अनेक शिक्षक अध्ययन अध्यापन करताना स्वताचे तंत्र वापरत असतात. त्या तंत्रांचा वापर करण्याचे स्वातंत्र्य या उपक्रमांतर्गत सर्व शिक्षकांना होते. म्हणुन ते नवनवीन प्रयोग करुन विद्यार्थी गुणवत्तेवर काम करत होते.यातूनच स्वनिर्मित शैक्षणिक साहित्याची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली व याचा दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये वापर होऊ लागला आणि हीच बाब विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी महत्वपूर्ण ठरली

▪ **महादीप जिल्हास्तरीय स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांची विमान वारी**

यवतमाळ जिल्ह्यात महादीप ही स्पर्धा परीक्षा होते. त्यात शाळा स्तरावर दोन फेऱ्या होऊन त्यातील पाचवी ते आठवीच्या प्रथम क्रमांकाच्या पाच मुलांची निवड केली जाते केंद्रस्तरावर देखील परीक्षेच्या दोन फेऱ्या आयोजित केल्या जातात  यातून प्रत्येक वर्गातील  पाच विद्यार्थी निवडून त्यांना तालुकास्तरीय परीक्षेसाठी पाठवले जाते  तालुका स्तरावर  दोन फेऱ्या होऊन त्यातील गुणवत्ता प्राप्त प्रत्येक वर्गातील पाच विद्यार्थी अशा प्रकारे जिल्हा स्तरासाठी पात्र ठरतात .जिल्ह्यातील एकूण  सोळा पंचायत समिती मधून आलेल्या मुलांची अंतिम फेरी जिल्हास्तरावर होऊन त्यातील जी **56 विद्यार्थी** अंतिम गुणवत्ता यादीत आली त्यांना अधिकाऱ्यांसोबत विमानावरी घडवली जाते. त्यात आपल्या **पंचायत समिती उमरखेड चे तब्बल 10 विद्यार्थी पात्र ठरले. हे एक प्रकारे  उमरखेड पॅटर्न यशस्वी झाल्याचे प्रतीक दिसून येते.  मागील वर्षी या अंतिम गुणवत्ता यादीत आलेल्या मुलांना जिल्हा परिषदेमार्फत  प्रत्येकी  एक सायकल गिफ्ट देण्यात आली व दिल्ली ,चंदीगड, सिमला येथे विमानवरी घडविण्यात आली .**

▪ **पाचवी व आठवी स्कॉलरशिप परीक्षा मध्ये विद्यार्थ्यांचे यश**

**मुलांच्या पायाभूत क्षमतांवर वर्षभर काम झाल्यामुळे तसेच मुलांचे वेगवेगळे एक्स्ट्रा क्लासेस घेतल्यामुळे पाचवी व आठवी  साठी घेतल्या जाणाऱ्या स्कॉलरशिप मध्ये पंचायत समिती उमरखेडचे 134 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले व लाखो रुपयांची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांनी मिळविली ही बाब सुद्धा  उमरखेड  पॅटर्न साठी महत्त्वाची ठरली**

▪ **नवोदय परीक्षेमध्ये यश**

**केंद्र शासनामार्फत गुणवत्तापूर्ण ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या नवोदय परीक्षेमध्ये मागील दोन वर्षात म्हणजेच सत्र 2022- 23 मध्ये 35 विद्यार्थी व व 2023- 24 साठी 25 विद्यार्थ्यांची निवड फक्त उमरखेड तालुक्यामधून नवोदय शाळेमध्ये झाली ही गोष्ट गुणवत्तेचे धोतक ठरले .**

▪ **एन एम एम एस परीक्षेत विद्यार्थ्यांचे लक्षवेधी यश**

**केंद्र शासनाकडून घेण्यात येणारी NMMS** या परीक्षेत शिक्षकांच्या सहकार्यातुन **एक लाख रुपये** किमतीची **300 पुस्तके पुण्यावरून मागवण्यात आली व उमरखेड पंचायत समितीमधील जिल्हा परिषद शाळेमधील** मुलांना अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आली. तसेच **10 हजार रुपयांची 57 प्रश्नपत्रिका संच ( 24 प्रश्नपत्रिका असणारा )कोल्हापूर** येथून मागवुन सराव पेपर घेण्यात आले. यातउमरखेड तालुक्यातील 87 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरली व त्या 87 मधील **27 विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेतील शिष्यवृत्तीधारक झाले.** म्हणजे तब्बल 16 ते 17 लाखाची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांनी मिळवली. म्हणजे एक प्रकारे एक लाखाच्या इन्वेस्टमेंट मध्ये आम्ही एका वर्षामध्ये 15 ते 16 लाख रुपये शिष्यवृत्तीच्या माध्यमातून बेनिफिट मिळवलं.

▪ **दिव्यांग रथ**

सर्वसामान्य विद्यार्थ्यांनसोबत शारीरिक व्यंग असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गुणांचा गौरव करण्यासाठी व त्यांच्या मनातील न्यूनगंड दुर करण्यासाठी दिव्यांग रथ रॅली शहरातून काढण्यात आली. या रॅलीत स्वता **गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी व शालेय पोषण आहार अधिक्षक व इतर सहकारी सहभागी होते.**

▪ **विद्यार्थी जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धेत उपविजेतेपद**

प्रत्येक शाळेचा सहभाग घेऊन विविध क्रिडा प्रकारात कौशल्य विकसित होण्यासाठी दरवर्षीच क्रिडा स्पर्धेचे आयोजन केले जाते. त्यात केन्द्रस्तरीय स्पर्धा, त्यानंतर तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धा पार पडतात. यामध्ये पंचायत समिती उमरखेड ने उत्कृष्ट नियोजन करत प्रत्येक विजेत्या खेळाडुस व संघास ट्रॉफी , मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. याचाच फायदा मुलांच्या आत्मविश्वास वाढण्यास झाला. जिल्हास्तरीय क्रिडा सामन्यांमधे विद्यार्थ्यांनी अप्रतिम कामगिरी करत 70 गुणांसह जिल्ह्याचे सर्वसाधारण उपविजेतेपद प्राप्त केले. 10 सायकली व 24 च्या वर रिस्ट घड्याळ बक्षीस म्हणून मिळवले.

▪ **शिक्षक, कर्मचारी कला क्रिडा स्पर्धेत उपविजेतेपद**

दरवर्षी कर्मचारी, शिक्षक यांच्याही कलागुण व क्रिडा कौशल्यास वाव देण्यासाठी आनंद मेळावा घेतला जातो. यातही सर्व प्रकारात सहभाग वाढवून जिल्ह्याचे सर्वसाधारण उपविजेतेपद आपल्या नावे केले. तब्बल 23

वर्षानंतर हा सन्मान मिळाला .कारण गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न अंतर्गत आढावा सभेमध्ये शिक्षक व महिला शिक्षकांना आवाहन करून स्पर्धेच्या दोन महिने अगोदर पूर्वनियोजित सराव घेतला त्याचाच परिणाम शिक्षक व महिला शिक्षक यांच्यात आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. अधिकारी व कर्मचारी यांच्यात सुसंवाद साधला गेला. 125 च्या चमुमधे तब्बल 40 महिलांनी सहभाग नोंदवला. संपूर्ण स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत नऊ सुवर्ण मेडल व नऊ रजत पदक मिळवून जिल्ह्याचे सर्वसाधारण व विजेतेपदक मिळविले त्याचबरोबर 35 शिक्षकांची विभाग स्तरावर जिल्ह्याकडून निवड झाली ही सुद्धा आनंदाची गोष्ट ठरली व हे सुद्धा या उपक्रमाची यशस्वीताच म्हणता येईल .

## जिल्हास्तर, विभाग स्तर व राज्यस्तरावर गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्नचे सादरीकरण

मागील वर्षभरामध्ये उमरखेड मध्ये राबवलेला गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न यशस्वी झाल्यामुळे त्याचे प्रथम सादरीकरण माननीय जिल्हाधिकारी साहेब व मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब आणि शिक्षण विभागांच्या समोर जिल्हास्तरावर करण्यात आले. त्याचा परिणाम यवतमाळ जिल्ह्यात राबवण्याचे माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी साहेबांनी सुचविले. त्यानंतर याची प्रसिद्धी वाढत गेल्यानंतर विभाग स्तरावरील कार्यशाळेत माननीय विभागीय उपसंचालक साहेबांच्या समोर या पॅटर्नचे सादरीकरण झाले व तेथेही मोठ्या प्रमाणात कौतुक झाले. त्यानंतर नागपूर येथे राज्यस्तरीय कार्यशाळा नागपूर व अमरावती विभागाची आयोजित करण्यात आलेली होती त्यामध्ये शिक्षण विभागाचे माननीय सचिव श्री रणजीत सिंह देओल साहेब उपस्थित होते आणि त्यांच्यासमोर अमरावती विभागातून गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न सादर करण्याची संधी मिळाली . या सादरीकरणानंतर हा माझा गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न विशेष प्रकारे माननीय सचिव साहेबांना आवडला व त्यांनी माझे अभिनंदन सुद्धा केले . अशाप्रकारे मागील वर्षभरामध्ये केलेल्या कामाची पावती मला मिळाली.

**७) समारोप**

एकंदरीत **गुणवत्तेचा उमरखेड पॅटर्न** हा कार्यक्रम राबवून कमी कालावधीत प्रभावी कार्य केल्याचे समाधान प्राप्त झाले. या कार्यक्रमाचे डॉक्युमेंटेशन करुन त्याचा फायदा इतरांना ही व्हावा यासाठी संधी मिळेल तिथे सादरीकरण केले. कारण प्रत्येक मुलाचा सर्वांगीण विकास व्हावा हेच शिक्षणाचे धेय्य आहे. या उपक्रमातून ते बऱ्याच अंशी साध्य झाले आहे. याच्याही पुढे जाऊन आणखी दोन वर्ष गुणवत्तेवर व अडव्हान्स ॲक्टीविटीज राबवण्याचा मानस आहे. या नवोपक्रमाचा सर्वांना फायदा होईल ही आशा आहे.

**८) संदर्भसूची व परिशिष्टे**

………………………………………………………………………………………….